नि.दि.दा.क्र. ०४/२००८
हरिभाउ -विरुध्द- माधव.

आदेश निशाणी ५९ खाली
(दिनांक १०/०१/२०१३)

१. प्रस्तुत अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ०६ नियम १७ अन्वये दाव्यात दुरुस्ती करण्यासाठी व दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ०१ नियम १० अन्वये काही प्रतिवादींना दाव्यातून वगळण्याबाबत अर्ज केला आहे.

२. प्रस्तूत अर्जात वादीने असे तथ्यकथन केले की, प्रस्तूत दावा हा वादीने प्रतिवादी विरुध्द सरस निरस वाटणी होवून ताबा मिळण्याकरिता दाखल केलेला आहे. अर्जात पुढे असे तथ्यकथन केले की, वादमिळकतपैकी काही मिळकत वादीस प्रतिवादींनी हिश्याव्दारे दिलेली आहे. परंतु सदर मजकुर अनावधानाने वादपत्रात नमुद करणे राहून गेले आहे म्हणून तसा मजकुर वादपत्रात नमुद करणे आवश्यक आहे. अर्जात पुढे असे तथ्यकथन केले की, वादीस प्रतिवादी क्र.११ ते १७ विरुध्द दावा चालविणे नाही त्यामुळे त्यांना प्रस्तूत दाव्यातून वगळण्याची विंनती वादीने या अर्जाव्दारे केली आहे.

३. प्रतिवादीचे बाजूने लेखीउत्तर अर्जाचे पाठीमागे देण्यात आलेला आहे. लेखीउत्तरपत्रात प्रतिवादींनी असे तथ्यकथन केले की अर्ज हा विलंबाने देण्यात आलेला आहे. त्यामुळे अर्ज नामंजुर करण्याची विंनती त्यांनी केली आहे.

४. मी अर्जातील तथ्यकथन व प्रतिवादीचे प्रतिकथनाचे अवलोकन केले. अर्जदाराचे बाजूने त्याचे विद्यमान वकील श्री जि पी भाला तर प्रतिवादीचे बाजूने श्री विघ्ने यांचा युक्तीवाद ऐकला.

०५. प्रस्तूत दावा हा सरसनिरस वाटणी होऊन मिळणेकरिता दाखल केला आहे. त्यामुळे वादीस प्रतिवादींनी वादमिळकतपैकी काही मिळकत दिलेली आहे या संदर्भातील मजकुर वादी हा आपल्या वादपत्रात या प्रस्तूत अर्जाचे दुरुस्ती आधारे नमुद करण्याची विंनती करीत आहे. सदर प्रस्तावित दुरुस्तीमुळे प्रतिवादींचे हक्कास बाधा निर्माण होत नाही तसेच प्रतिवादींचे विद्यमान वकील श्री बी एन विघ्ने यांनी युक्तीवादा दरम्यान दुरुस्तीस विरोध नसल्याचे सांगितले. तसेच वादी व प्रतिवादी यांचा वादमिळकतीत हिस्सा ठरविण्याकरिता व वादमिळकत त्यांच्या हिश्यात अदयापर्यंत किती देण्यांत आलेली आहे हे प्रस्तूत प्रकरणात मुळ मुददा निर्णित होण्याकरिता अभिलेखावर येणे आवश्यक आहे. म्हणून प्रस्तावित दुरुस्ती ही नामंजुर करण्यास कोणतेही संयुक्तिक कारण नाही. परंतु वादीची विनंती की प्रतिवादी क्र.११ ते १७ यांना प्रस्तूत प्रकरणातून वगळावे ही मंजुर करण्यासारखी नाही कारण प्रस्तूत दावा हा वाटणीकरिता दाखल केलेला आहे आणि मिळकतीत हिस्सा मिळण्यास हक्कदार असलेले प्रत्येक व्यक्ती हा प्रस्तूत दाव्यात आवश्यक पक्षकार आहे. म्हणुन या हददीपर्यंत वादीची प्रस्तावित अर्जातील विंनती नामंजुर होण्यास पात्र आहे. म्हणून मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१.	प्रस्तूत अर्ज अंशतः  मंजुर करण्यांत येतो.

२	वादीने मागणी केलेली प्रस्तावित दुरुस्ती ही मंजुर करण्यांत येते.

३	वादीने प्रस्तावित दुरुस्ती ही आजपासून ०७ दिवसांचे आंत करुन घ्यावी.

४	वादीची प्रतिवादी क्र.११ ते १७ यांना प्रस्तूत  दाव्यातून वगळण्याची विंनती नामंजुर करण्यात येते.

३.	अर्जाचा खर्च रक्कम रुपये ७००/- (रुपये सातशे  फक्त) द्यावा.

दिनांक १०/०१/२०१३

(राजेश क. खोमणे)
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर
देउळगावराजा.